**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी**

**ता.राहाता, जि.अहमदनगर**

**<u>जुन्या वाहनांच्या जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती</u>**

गुरुवार दि. ०८/०८/२०१९ रोजी श्री साईबाबा संस्थानचे वाहन विभागाकडील जुन्या वाहनांची मा.विश्वस्त तसेच अधिका-यांचे उपस्थितीत जाहीर लिलावाने विक्री करावयाची आहे. जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे-

१) जुन्या वाहनांचे जाहीर लिलावात भाग घेवू इच्छिणा-या व्यक्ती अगर संस्थांना लिलावापूर्वी चारचाकी वाहनाकरीता अनामत रक्कम रू.४०,०००/- (अक्षरी-चाळीस हजार मात्र), दोनचाकी वाहनांसाठी रु.१०,०००/- (अ.रु-दहा हजार मात्र) संस्थानमध्ये रोखीने भरावी लागेल. त्याखेरीज लिलावात भाग घेता येणार नाही व बोली बोलता येणार नाही.

२). लिलावाचे वेळी अनामत रक्कम भरणा-या व्यक्तीस संस्थानतर्फे विशिष्ट क्रमांकाचे टोकन देण्यात येईल. त्याच व्यक्तीने जाहीर लिलावात बोली बोलावयाची आहे. सदरचे टोकन इतर व्यक्तीचे ताब्यात दिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी मुळ टोकनधारकांची राहील.

३) प्रत्येक वाहनाचा लिलाव स्वतंत्र करण्यात येईल.

४) जाहीर लिलावातील वाहने आहे त्या स्थितीत विक्री करावयाची आहे.

५) लिलावात बोली चालू असतांना वाहनाची तीन वार बोलीची किंमत संस्थानला मान्य असल्यास शेवटची बोली बोलणा-याचे नांव मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने तीनवार बोली लिलाव पध्दतीने पुकारून त्याचवेळी पुर्ण केला जाईल. वाहनाची किंमत योग्य आली नाही, असे दिसून आल्यास सदरील वाहनाचा लिलाव स्थगित करण्यात येईल, याबाबतचा संपूर्ण अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहील. त्याबाबत कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

६) ज्या वाहनाचा तीन वार बोलीने लिलाव मंजूर होईल, त्या लिलावधारकाने तीनवार बोली रक्कमेच्या २५ टक्के रक्कम एक तासाचे आंत संस्थानला जमा करावयाची आहे. उर्वरीत रक्कम जास्तीत जास्त ७ दिवसाचे आंत भरून आपले वाहन ताब्यात घ्यावयाचे आहे. त्यानंतर होणा-या नुकसानीस संस्थान जबाबदार राहणार नाही, याची सर्व लिलावधारकांनी नोंद घ्यावी.

७) ज्या व्यक्ती अगर संस्था यांचे नांवे लिलावातील वाहनाची तीन वार बोली मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने पुर्ण झालेली आहे, त्यांनी तीनवार बोलीची संपूर्ण रक्कम अधिक त्या रकमेवर TAX (GST) वगैरे संदर्भात आकारण्यात येणारी रक्कम जेव्हा रोखीने अथवा डीडी/चेकद्वारे संस्थान खात्यात जमा होईल, त्यानंतर संबंधीत वाहन लिलावधारकाचे ताब्यात देण्यात येईल.

८) जाहीर लिलावात भाग घेतलेल्या व्यक्तीने तीन वार बोलीने विहीत मुदतीत रक्कम भरून वाहन ताब्यात न घेतल्यास संबंधितांनी जाहीर लिलावपोटी जमा केलेली अनामत रक्कम तसेच २५ टक्के रक्कम त्यांना परत केली जाणार नाही. अशा वाहनाची विल्हेवाट लावण्याचे अधिकार संस्थानला राहतील, याबाबत आपणांस कुठलीही तक्रार करता येणार नाही.

९) वाहनाचा जाहीर लिलाव पुर्ण झालेनंतर त्याची संपुर्ण रक्कम लिलावधारकाने संस्थानला जमा करावयाची आहे व सदरील वाहन आपले ताब्यात घ्यावयाचे आहे. तीन वार बोलीनंतर २४ तासाचे आत लिलावधारकाने वाहन ताब्यात न घेतल्यास त्यानंतरच्या होणा-या नुकसानीस संस्थान जबाबदार राहणार नाही. अन्यथा त्या वाहनाचे संरक्षणाची अगर ऊन, वारा,पाऊस अशा नैसर्गिक आपत्तीमुळे काही नुकसान झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी लिलावधारकाची राहील.

१०) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मधील कर्मचा-यास जाहीर लिलावात भाग घेता येणार नाही.

११) वाहनाचा जाहीर लिलाव घेतलेनंतर सदरचे वाहन ताबडतोब स्वखर्चाने लिलावधारकाने आपले नांवावर करून घ्यावयाचे आहे. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी लिलावधारकाची राहील. यानंतर काही तक्रार आल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

१२) जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती यामध्ये काही फेरबदल करण्याचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी राखून ठेवलेले आहे. त्यावर कोणतेही कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

१३) जाहीर लिलावामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव वाद निर्माण झाल्यास सदर बाबतचे कामकाज राहाता व कोपरगांव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

१४) वरील अटी व शर्तीचे सर्व लिलावधारकांनी काटेकोरपणे पालन करावयाचे आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

(दी.म.मुगळीकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

३१/०५/१९

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी**

**ता.राहाता, जि.अहमदनगर**

**<u>निरूपयोगी भंगार साहित्याच्या जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती</u>**

गुरुवार दि. ०८/०८ /२०१९ रोजी संस्थानचे वाहन विभाग परिसरात श्री साईबाबा संस्थानकडील निरूपयोगी डेडस्टॉक भंगार साहित्याची मा.विश्वस्त तसेच अधिका-यांचे उपस्थितीत जाहीर लिलावाने विक्री करावयाची आहे. सदरील जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे-

१) निरूपयोगी भंगार साहित्याचे जाहीर लिलावात भाग घेवू इच्छिणा-या व्यक्तींना लिलावापूर्वी अनामत रक्कम रू.१०,०००/- (अक्षरी दहा हजार मात्र) संस्थानमध्ये रोखीने भरावी लागेल. त्याखेरीज लिलावात भाग घेता येणार नाही व बोली बोलता येणार नाही.

२) लिलावाचे वेळी अनामत रक्कम भरणा-या व्यक्तीस संस्थानतर्फे विशिष्ट क्रमांकाचे टोकन देण्यात येईल. त्याच व्यक्तीने जाहीर लिलावात बोली बोलावयाची आहे. सदरचे टोकन इतर व्यक्तीचे ताब्यात दिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी मुळ टोकनधारकांची राहील.

३) लिलावातील साहित्याचे लॉट तयार करून प्रत्येक लॉटचा लिलाव स्वतंत्र करण्यात येईल.

४) जाहीर लिलावातील भंगार साहित्याचे लॉट तयार करून त्यातील साहित्याची ' **जेथे आहे, जसे आहे** ' त्या स्थितीत विक्री करावयाची आहे. अशाप्रकारे साहित्य आहे त्या स्थितीत मंजूर लिलावधारकाने स्वखर्चाने काढून न्यावयाचे आहे. याबाबत पुन्हा तक्रार करता येणार नाही.

५) लिलावात बोली चालू असतांना भंगार साहित्याचे लॉटची तीन वार सर्वात जास्त बोलीची किंमत संस्थानला मान्य असल्यास शेवटची बोली बोलणा-याचे नांव मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने तीनवार बोली लिलाव पध्दतीने पुकारून त्यावेळी पुर्ण केला जाईल. लॉटची किंमत योग्य आली नाही, असे दिसून आल्यास सदरील लॉटचा लिलाव स्थगित करण्यात येईल, याबाबतचा संपूर्ण अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहील. त्याबाबत कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

६) ज्या लॉटचा तीन वार बोलीने लिलाव मंजूर होईल, त्या लिलावधारकाने तीनवार बोली रकमेच्या २५ टक्के रक्कम एक तासाचे आंत संस्थानला जमा करावयाची आहे. उर्वरीत रक्कम लिलाव तारखे पासून जास्तीत जास्त ७ दिवसाचे आंत भरून आपले साहित्य ताब्यात घ्यावयाचे आहे.

७) लिलावधारकाने आपणांस मंजूर झालेल्या लॉटमधील साहित्य ताब्यात घेणेपुर्वी साफ/सफाई करणे , त्यातील घाण काढणे, तसेच काही अडचणी असल्यास त्याबाबत पुर्वकल्पना अधिक्षक, अभिलेख कक्ष विभाग यांना द्यावी. तसेच काम करत असतांना लिलावधारकांकडील कामगारांस काही दुखापत/इजा झाल्यास, त्यासाठी येणा-या खर्चाची व इतर जबाबदारी संबंधित लिलावधारकाची राहील. यास संस्थान जबाबदार राहणार नाही, याची सर्व लिलावधारकांनी नोंद घ्यावी.

८) ज्या व्यक्तीच्या नांवे लिलावातील भंगार साहित्याचे लॉटची तीन वार बोली मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने पुर्ण झालेली आहे, त्यांनी तीनवार बोलीची संपूर्ण रक्कम अधिक त्या रकमेवर TAX (GST) वगैरे संदर्भात आकारण्यात येणारी रक्कम जेव्हा रोखीने अथवा डीडी/चेकद्वारे संस्थान खात्यात जमा होईल. त्यानंतर संबंधीत लॉटमधील साहित्य लिलावधारकाचे ताब्यात देण्यात येईल. तसेच भविष्यात संस्थानकडे लिलावातील साहित्यावर टॅक्सेसची मागणी झाल्यास ती भरण्याची जबाबदारी लिलावातील साहित्य खरेदीदाराची राहील.

९) जाहीर लिलावात भाग घेतलेल्या व्यक्तीने तीन वार बोलीने विहीत मुदतीत रक्कम भरून आपले मंजूर लॉटमधील साहित्य ताब्यात न घेतल्यास संबधितांनी जाहीर लिलावपोटी जमा केलेली अनामत रक्कम तसेच २५ टक्के रक्कम त्यांना परत केली जाणार नाही. अशा लॉटमधील साहित्याची विल्हेवाट लावण्याचे अधिकार संस्थानला राहतील, याबाबत आपणांस कुठलीही तक्रार करता येणार नाही.

१०) भंगार साहित्याचे लॉटचा जाहीर लिलाव पुर्ण झालेनंतर त्याची संपुर्ण रक्कम लिलावधारकाने संस्थानला जमा करावयाची आहे व सदरील लॉटमधील साहित्य आपले ताब्यात घ्यावयाचे आहे. तीन वार बोलीनंतर २४ तासाचे आत लिलावधारकाने साहित्य ताब्यात न घेतल्यास त्यानंतरच्या होणा-या नुकसानीस संस्थान जबाबदार राहणार नाही. अन्यथा त्याचे संरक्षणाची अगर ऊन, वारा,पाऊस अशा नैसर्गिक आपत्तीमुळे काही नुकसान झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी लिलावधारकाची राहील.

११) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मधील कर्मचा-यास जाहीर लिलावात भाग घेता येणार नाही.

१२) जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती यामध्ये काही फेरबदल करण्याचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी राखून ठेवलेले आहे. त्यावर कोणतेही कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

१३) जाहीर लिलावामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव वाद निर्माण झाल्यास सदर बाबतचे कामकाज राहाता व कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

१४) वरील अटी व शर्तींचे सर्व लिलावधारकांनी काटेकोरपणे पालन करावयाचे आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

(दी.म.मुगळीकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

31/05/19